महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित

(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगांव (पूर्व), मुंबई-४०००६५

---

**शासकीय सेवेतील सेवानिवृत्त अधिकारी करार / कंत्राटी पध्दतीने मुलाखतीद्वारे भरणेबाबत.**

| | | |
|---|---|---|
| १ | कार्यालयाचे नाव | महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित. गोरेगांव (पू.), मुंबई - ६५ |
| २ | पदनाम व पदसंख्या | “मुख्य कार्यकारी अधिकारी (सांस्कृतिक समन्वय आणि विशेष प्रकल्प)” - १ पद |
| ३ | पदाचे स्वरुप व कालावधी | कंत्राटी/ करार पध्दतीने ११ महिने. |
| ४ | सविस्तर जाहिरात व अर्ज उपलब्धतेचे ठिकाण | www.filmcitymumbai.org |
| ५ | अर्ज पाठविण्याचे ठिकाण | filmcitycao@gmail.com |
| ६ | अर्ज स्विकारण्याचा दिनांक | दि.२६.०८.२०२४ ते दि.०३.०९.२०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत |
| ७ | निवड पध्दत | मुलाखतीद्वारे |

अर्जाचा नमुना, पदाची अर्हता, अनुभव, अटी शर्ती यांचा तपशील www.filmcitymumbai.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. संकेत स्थळावर उपलब्ध असलेल्या विहित नमुन्यातच अर्ज सादर करावा, अन्यथा आपल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

स्वाक्षरी

व्यवस्थापकीय संचालक

म.चि.र.व सां.वि.म. मर्यादित

महाराष्ट्र चित्रपट,रंगभमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित
(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)
दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव (पूर्व), मुंबई-४०० ०६५.

---

**शासकीय सेवेतील सेवानिवृत्त अधिकारी करार / कंत्राटी पध्दतीने मुलाखतीद्वारे भरण्याबाबत जाहिरात.**

महामंडळातील सद्यास्थितीतील कामाचे स्वरुप व कर्मचाऱ्यांची संख्या विचारात घेवून सरळसेवेने भरती होईपर्यंत किंवा आवश्यतेनुसार शासकीय सेवेतील निवृत्त वर्ग-०१ च्या दर्जाचा अधिकारी प्रथम ११ महिन्याच्या कालावधीसाठी सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्र.संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दि.१७.१२.२०१६ अटी व शर्तीच्या अधिन राहुन मुलाखतीद्वारे करार पद्धतीने भरण्यासाठी खालीलप्रमाणे अर्ज मागविण्यात येत आहे:-

| क्र. | पदाचे नाव | संख्या | अर्ज करण्यास अर्हता | कामकाजाचे स्वरुप |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | मुख्य कार्यकारी अधिकारी (सांस्कृतिक समन्वय आणि विशेष प्रकल्प) | १ | सेवा निवृत्त - उप सचिव **किंवा** तत्सम शासन सेवेतील समकक्ष वेतन श्रेणीतील अधिकारी (S-२५ वेतन श्रेणीतील) | या महामंडळाकडे खालील प्रमाणे कामकाज आहे.<br>१.सिनेमा, नाट्यकला व तमाशासह लोककला, संगीत, नृत्य आणि इतर प्रयोगनिष्ठा कला, या क्षेत्रामधील सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्याचा अनुभव,<br>२. सर्वसाधारणपणे चित्रपटांचां आणि विशेषतः मराठी चित्रपटांचा विकास करणे, त्याला मदत देणे, सहाय्य करणे, ते सुरू करणे, वाढविणे आणि त्यांची निर्मिती, वितरण व प्रदर्शन यासाठी अर्थसहाय्य देणे तसेच विशेष अनुकूल अटींवर सहाय्य देणे आणि इतर भाषांतील चित्रपटांसाठी याच प्रकारे मदत करणे.<br>३. चित्रपट महोत्सव, नाट्य महोत्सव, संगीत व नृत्य संमेलने आणि तसेच लोककला महोत्सव आयोजित करणे व ते संघटित करणे इत्यादी कामाचा अनुभव असलेले सेवानिवृत्त अधिकारी.<br>४.किमान २० वर्षाचा शासनाचा वर्ग-०१ पदावरील अनुभव |

२. अर्हता :- अ) शासन सेवेतील १जानेवारी २०२३ ते ३१ ऑगस्ट २०२४ या कालावधीत सेवा निवृत्त झालेले अधिकारी.
ब) शारिरीक व बौध्दिकदृष्ट्या कार्यक्षम असणे आवश्यक.
क) मराठी, हिंदी आणि इंग्रजी लिहिण्या व वाचण्याची क्षमता आवश्यक.
ड) कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी प्रलंबित अथवा प्रस्तावित नसावी.

३. वित्तलब्धी :- सेवानिवृत्ती पूर्वीच्या वेतनातून सद्यस्थितीत प्राप्त होणारे निवृत्तीवेतन वजा करून शिल्लक रहाणारी रक्कम इतके वेतनमान देय राहील.

**४. पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या :-** वरील सर्व पदांच्या जबाबदाऱ्या तक्त्यातील स्तंभ क्र.५ मध्ये नमूद करण्यात आल्या आहेत.

५. अर्जाचा नमुना व इतर अनुषंगिक बाबी महामंडळाच्या www.filmcitymumbai.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

वरील अर्हता धारण करण्याऱ्या उमेदवारांनी शैक्षणिक अर्हता, अनुभव आणि वयाच्या पुराव्याबाबतची कागदपत्रे, सेवेत असताना सेवानिवृत्तीच्या वेळी धारण केलेल्या पदाच्या पुराव्यार्थ आवश्यक त्या (उदा. सेवा निवृत्ती वेळेचे वेतन प्रमाणपत्र व निवृत्ती वेतन प्रमाणपत्र) साक्षांकित कागदपत्रासह विहीत नमुन्यात खालील पत्यावर डाकद्वारे किंवा filmcitycao@gmail.com या इमेल आयडीवर ऑनलाईन दि.०३.०९.२०२४ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत अर्ज पोहचेल असा करावा.

**व्यवस्थापकीय संचालक,**
**महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित,**
**दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६५.**

"मुख्य कार्यकारी अधिकारी (सांस्कृतिक समन्वय आणि विशेष प्रकल्प)" या पदावर कंत्राटी / करार पध्दतीने भरण्याकरीता प्राप्त होणाऱ्या अर्जांची संख्या विचारात घेऊन त्यानुसार छाननी करुन पात्र उमेदवारांपैकी उमेदवारांचा अनुभव व वयोमर्यादा विचारात घेऊन सुयोग्य उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल सुयोग्य उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्याचे किंवा नाकारण्याचे सर्व हक्क महामंडळ राखून ठेवत आहेत. मुलाखतीचा दिनांक व वेळ पात्र उमेदारांना यथावकाश कळविण्यात येईल.

स्वाक्षरी,
व्यवस्थापकीय संचालक
म.चि.र.व सां.वि.म. मर्यादित

# अर्जाचा नमुना

## शासकीय सेवेतील सेवानिवृत्त अधिकारी करार पध्दतीने मुलाखतीद्वारे भरण्याबाबतचा अर्जाचा नमुना

| | | |
|---|---|---|
| १ | अर्जदाराचे नांव | |
| २ | अर्ज करत असलेल्या पदाचे नाव | |
| ३ | जन्म तारीख | |
| ४ | पत्रव्यवहारासाठीचा पत्ता | |
| ५ | ई- मेल | |
| ६ | दूरध्वनी / मोबाईल क्रमांक | |
| ७ | शैक्षणिक अर्हता | |
| ८ | सेवा निवृत्ती दिनांक व सेवा कालावधी | |
| ९ | निवृत्तीच्यावेळी कार्यरत असलेल्या कार्यालयाचा तपशील व कालावधी | |
| १० | सेवा निवृत्तीच्या वेळी धारण केलेले पद | |
| ११ | विभागीय चौकशी झालेली / प्रस्तावित / प्रलंबित आहे किंवा कसे याचा तपशिल | |
| १२ | सेवा निवृत्ती वेळेचे वेतन प्रमाणपत्र व निवृत्ती वेतन मिळत असल्यास निवृत्ती वेतन प्रमाणपत्र | |

अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी